| रे.मु.नं.२७६/२०२३ मधील निशाणी क्र.१८<br>खालील आदेश<br>(माणिक लंघे विरुध्द त्रिंबक शिंदे व इतर) | MHAH140003942023 |
|---|---|

१. सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जासोबत वादीने शपथपत्र जोडलेले आहे.

२. वादीने सदर अर्जात कथन केले आहे की, मूळ दावा जाहीर ठराव व निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. परंतु, दावा प्रलंबित असताना दि.२६.०८.२०२४ रोजी प्रतिवादी यांनी दस्त क्र. ५०९१/२०२४ अन्वये दावा मिळकतीचे त्रयस्थ इसमास विना कब्जा साठेखत करुन दिलेले आहे. प्रतिवादी हे खरेदीखत करण्याच्या विचारात आहेत. त्यामुळे दाव्यामध्ये सदर त्रयस्थ इसमास सामील करुन त्याप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

३. पुरेशी संधी देवून देखील प्रतिवादींने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल केले नाही. वादीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुत अर्जात मागितलेली दुरुस्ती ही दावा प्रलंबित असताना प्रतिवादी यांनी दि.२६.०८.२०२४ रोजी केलेला दस्त क्र. ५०९१/२०२४ यावरुन मागितलेली आहे. सदर दस्ताची प्रत वादीने अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर दस्ताअन्वये त्रयस्थ इसमास दावा मिळकतीचे साठेखत करुन दिलेले आहे. अर्जात मागितलेली दुरुस्ती ही दावा प्रलंबित असताना दावा मिळकतीचे हस्तांतर झाल्याच्या कारणावरुन मागितलेली आहे. त्यामुळे दाव्याचा गुणदोषावर पूर्णतः निकाल लावणेकरीता सदरची दुरुस्ती आवश्यक आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश

पारित करीत आहे–

## <u>आदेश</u>

१. निशाणी १८ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तुत अर्जात मागितलेली दुरुस्ती आदेश तारखेपासून १४ दिवसांच्या आत करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

३. वादीने वरीलप्रमाणे पूर्तता केल्यानंतर प्रस्तावित प्रतिवादी यांना समन्स काढण्यात यावेत.

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.01.30 13:49:20 +0530

**(संध्या यु. सुळ)**

ठिकाण– नेवासा — २ रे सह दिवाणी न्यायाधीश,

दिनांक ३०/०१/२०२५ — क.स्तर, नेवासा